


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १८६ •रविवार, दि.०५ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955






# स्व.काकूंचे जीवन परोपकारासाठीच - रामायणाचार्य रामराव ढोक महाराज



## आम्ही स्व.काकूंचे वारसदार असल्याचा अभिमान वाटतो : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर







बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून स्व.काकूंकडे पाहिले जाते त्यांना अभिवादन करण्यासाठी एवढा मोठा चाहता वर्ग उपस्थित राहतो हेच काकूंच्या कार्याची पावती आहे. अशा लोकनेत्या स्व.काकूंचा कधीही विसर पडू नये असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प. ढोक महाराज यांनी केले तर स्व.काकूंचे आम्ही वारसदार असल्याचा अभिमान वाटतो, काकूंसारख्या कर्तबगार महिलेने शून्यातून विश्व निर्माण केल्याची प्रेरणा घेण्यासारखी असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शनिवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी माजी खासदार स्व.केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचवेळी प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांच्या कीर्तनाचेही आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम क्षीरसागर कुटुंबीयांच्या वतीने काकूंना अभिवादन करण्यात आले त्यानंतर भरगच्च भरलेल्या मैदानात कीर्तनाला प्रारंभ झाला. यावेळी किर्तन सांगताना रामायणाचार्य ढोक महाराज म्हणाले की, माय गेली बाप गेला आता सांभाळी विठ्ठला या संत जनाबाईंचा अभंग घेत ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या स्व.काकूंच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी मोठा चाहता वर्ग उपस्थित असतो. एवढ्या मोठ्या कार्यक्रमात कुठलीही कसर न करता योग्य आणि सुंदर नियोजन करून हा स्मृती सोहळा साजरा होत असतो. पुण्याचा संचय करतो तो पुण्य आत्मा असतो परोपकार हेच पुण्य असते तसे काकूंचे काम होते. हजारो परिवारांना ▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यातील सर्व संवर्गातील सेवा प्रवेश नियमांत सुधारणा करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

• २०२६ हे पदभरतीचे वर्ष असणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या प्रत्येक संवर्गातील पदे आणि त्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये कालानुरूप मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे, हे लक्षात घेऊन राज्यातील सर्व संवर्गातील पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यात



येणार आहे, असे सांगून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पदभरती प्रक्रिया गतीशील करून २०२६ या वर्षात मोठ्या प्रमाणात पदभरती करण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले. शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांनी लोकाभिमुख आणि पारदर्शी पद्धतीने आपले काम करावे असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सामान्य प्रशासन विभागातर्फे अनुकंपा तत्वावरील व लिपिक श्रेणीतील १० हजार ३०९ उमेदवारांना नियुक्तीपत्र ▶ उर्वरित पान २ वर

# पत्नीला कारमध्ये प्रियकर API सोबत रंगेहाथ पकडले, मग पतीने भर रस्त्यात बदडले



बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये असताना एका विवाहितेला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर धाराशिवला बदली झाली. पिस्तूलचा धाक दाखवून बलात्कार केला. त्यानंतर महिन्यापासून त्याच पीडितेवर पुन्हा प्रेम जडले. दोघेजण कारमधून फिरताना पतीने रंगेहाथ पकडते. त्यानंतर भर रस्त्यावर प्रियकर असलेल्या सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र शिंदे याला कपडे फाटेपर्यंत बदडले. हा प्रकार शुक्रवारी दुपारी २ वाजता बीड शहरातील बसस्थानकासमोर घडला. अजब प्रेमाच्या या गजब कहाणीची जोरदार चर्चा सुरू आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# पिंजरा फेम अभिनेत्री संध्या शांताराम यांचं निधन, वयाच्या ९४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

मुंबई । प्रतिनिधी

मराठी सिनेमांमध्ये पिंजरा हा आयकॉनिक मुव्ही मानला जातो. या सिनेमात आपल्या बहारदार नृत्याने प्रेक्षकांची मनं जिंकून घेणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम या काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. नुकतेच त्यांचे निधन झाले आहे. वयाच्या ९४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आशिष शेलार यांनी ट्विट करुन याबाबत माहिती शेअर केली. त्यांनी लिहिले की, भावपूर्ण



श्रद्धांजली ! 'पिंजरा' चित्रपटातील प्रसिद्ध अभिनेत्री संध्या शांताराम जी यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.0 अंतर्गत दोन नवीन ५ MV ट्रान्सफॉर्मर मंजूर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जेद्वारे सातत्यपूर्ण आणि शाश्वत वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत दोन प्रमुख उपकेंद्रांवर ५ चत क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत.शेतकरी व नागरिकांतून आनंद उत्सव साजरा करत राज्य



सरकार व आ.सुरेश धस यांचे आभार मानले.

या मंजुरीनंतर रोहतवाडी ३३ के. व्ही. उपकेंद्र, रोहतवाडी आणि ३३ के. व्ही. उपकेंद्र, डोंगरकिन्ही येथे कामे मोठ्या वेगाने सुरू झाली आहे.या कामांमुळे शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत सौर ऊर्जेद्वारे शेती सिंचनासाठी स्थिर, विश्वासार्ह आणि शाश्वत वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेती उत्पादनात वाढ, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळेल. या यशाबद्दल बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणींचे निराकरण आणि ऊर्जेच्या स्थिर पुरवठ्यासाठी मी नेहमीच ▶▶ उर्वरित पान २ वर

# जाहिराती देत नसलेल्या नेत्यांच्या बातम्या छापू नयेत-संपादक संघाचा निर्णय

बीड । प्रतिनिधी

वृत्तपत्रांना जाहिराती न देणार्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या बातम्या छापण्यात येवू नयेत असे बीडमधील मराठी वृत्तपत्रांच्या संपादकांनी आपसात विचार विनिमय करून निर्णय घेतला आहे. सर्व संपादकांनी सदर निर्णयाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आवाहन संपादक संघाच्या वतीने करण्यात आले आहे. या बाबत अधिक माहिती अशी की, जिल्ह्यातील सर्व मराठी वृत्तपत्रे सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्याच्या सर्व कार्यकर्त्यांच्या मोठमोठ्या बातम्या छापल्या जातात. अनेक नेत्यांना प्रसिद्धी देवून वृत्तपत्रांनी मोठे केले आहे. त्यांना आमदार, खासदार, मंत्री करण्यात वृत्तपत्रांचा मोठा वाटा आहे. अगदी ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, नगर पालिका आदी कार्यकर्त्यांच्या पाठीशी वृत्तपत्रे उभी राहिली आहेत. परंतु हीच नेते मंडळी व कार्यकर्ते वृत्तपत्रांना जाहिराती देत नाहीत, जाहिराती देण्यासाठी आपला हात आखडता घेतात. मात्र निवडणुकीमध्ये कोट्यावधी रूपयांची ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडे यांनी बीड शहरातील ढाका कुटुंबियांची भेट घेऊन केले सांत्वन

• देवेंद्र भाऊ तुम्ही एकटे नाहीत, आम्ही स्व. यशच्या न्यायाच्या लढ्यात तुमच्या पाठीशी : धनंजय मुंडे
• यश ढाका हत्याप्रकरणातील सर्व आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करणार – मुंडेंचा शब्द

बीड । प्रतिनिधी

बीड येथील पत्रकार देवेंद्र ढाका यांच्या यश नामक २२ वर्षीय तरुण मुलाची बीड शहरात काही दिवसांपूर्वी दिवसाढवळ्या एका टोळक्याकडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. आज माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी बीड शहरातील ढाका कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. स्वर्गीय यश



ढाका या उमद्या तरुणाची बीड शहरातील गजबजलेल्या माने कॉम्प्लेक्स भागात दिवसाढवळ्या हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचे व्हिडीओ सुद्धा व्हायरल झाले होते. अल्पसंख्यांक मागासवर्गीय समाज असलेल्या वाल्मिकी समाजातील देवेंद्र ढाका व त्यांच्या परिवारावर यामुळे दुःखाचा डोंगर कोसळला असून, ढाका ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमधील वंजारी-मराठा वाद कुणामुळे ? इतिहास संशोधकाने स्पष्टच सांगितले...

पुणे । प्रतिनिधी

'राजकारण आणि गुंडांच्या टोळ्यांमुळे वैभवशाली इतिहास असलेल्या बीड जिल्ह्याचे वर्तमान गंभीर दिसते आहे. परळीत घडलेल्या घटनांमुळे संपूर्ण बीड जिल्ह्याला बदनाम करता येणार नाही. दोन-चार संस्थानिक घराणी आणि त्यांचे कार्यकर्ते म्हणजे बीड जिल्हा नाही. बीडमधील मराठा आणि वंजारी हा राजकारणाने पेटवलेला वाद आहे. त्याने सगळ्या समाजाला वेठीस धरले आहे. त्याव्यतिरिक्त बीड जिल्ह्यात कोणताही जातिवाद नाही,' असे मत इतिहास संशोधक डॉ. सतीश साळुंके यांनी शुक्रवारी व्यक्त केले. 'बीडमध्ये कला-साहित्य आणि सांस्कृतिक ▶ उर्वरित पान २ वर






# जागतिक शिक्षक दिन : बुद्धकालीन गुरू व आधुनिक शिक्षक

मानव इतिहासातील प्रत्येक युगात शिक्षक हा समाजाचा केंद्रबिंदू राहिला आहे. ज्ञान, संस्कार, मूल्ये, नैतिकता आणि जीवनाला दिशा देणारा दीपस्तंभ म्हणजे शिक्षक. म्हणूनच ५ ऑक्टोबर हा दिवस जगभर 'जागतिक शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. युनेस्कोने १९९४ साली या दिवसाची सुरुवात केली आणि तेव्हापासून संपूर्ण जगात शिक्षकांच्या योगदानाचा गौरव होत आहे. पण शिक्षक संकल्पना समजून घेण्यासाठी आपण केवळ आधुनिक काळात न थांबता प्राचीन काळात, विशेषतः बुद्धकालीन परंपरेत डोकावले पाहिजे. कारण त्या काळातील शिक्षण व शिक्षकाची भूमिका आजच्या काळातील शिक्षकांना प्रेरणा देणारी ठरते. बुद्धकालीन संदर्भ आणि आधुनिक संदर्भ या दोन परंपरांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने शिक्षक दिनाचा सखोल अर्थ होय. बुद्धकाळ हा भारतीय समाजजीवनातील बौद्धिक आणि सामाजिक परिवर्तनाचा कालखंड मानला जातो. त्या काळातील शिक्षक म्हणजे गुरु हे शिष्यांना फक्त ग्रंथपठण शिकवणारे नव्हते, तर ते जीवनमूल्यांचे शिल्पकार होते. गुरुकुल प्रणालीमध्ये शिष्य आपले संपूर्ण जीवन गुरुंच्या मार्गदर्शनाखाली व्यतीत करीत असत. ज्ञानासोबत संयम, सत्य, प्रामाणिकपणा, करुणा आणि समता यांचे शिक्षण दिले जाई. बुद्धकालीन शिक्षकांचा केंद्रबिंदू म्हणजे समाजहित. ते फक्त वैयक्तिक यशावर भर देत नसून शिष्यांच्या माध्यमातून संपूर्ण समाजाची प्रगती साधण्याचा प्रयत्न करीत.

गौतम बुद्ध स्वतः सर्वोत्तम शिक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी ज्ञानसंपादनाची नवी दृष्टी दिली. अप्प दीपो भव म्हणजे स्वतःचा प्रकाश स्वतः व्हा, हा त्यांचा उपदेश शिष्यांना आत्मनिर्भरतेचे धडे देणारा होता. त्यांनी कधीही अंधानुकरणाची शिकवण दिली नाही; उलट विवेकबुद्धी, तपासणी, शंका आणि संवाद यांवर आधारित शिक्षणपद्धती त्यांनी रुजवली. शिष्यांना त्यांनी सांगितले की तुम्ही माझ्या शब्दांवर आंधळा विश्वास ठेवू नका, विचार करा, अनुभव घ्या आणि मग स्वीकारा. हीच खरी गौतम बुद्धांची वैज्ञानिक वृत्ती होती. या विचारसरणीमुळे शिक्षकाची भूमिका केवळ तर्कबुद्धी जागवणारा आणि विवेक विकसित करणारा असा होती. बुद्धकालीन विहार आणि विद्यापीठे ही शिक्षक–शिष्य संबंधांची केंद्रे होती. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला यांसारख्या विद्यापीठांत शिक्षक केवळ विद्वान नव्हते तर समाजदूत होते. शिष्यांना ग्रंथपठणाबरोबर समाजसुधारक मूल्यांचे धडे दिले जात. पंचशील, अष्टांगिक मार्ग, करुणा आणि अहिंसा या बौद्ध मूल्यांवर आधारित शिक्षण हीच त्या काळातील शिक्षकांची खरी देणगी होती. शिक्षण हे फक्त ज्ञानसंपादनासाठी नसून समाजातील विषमता दूर करण्यासाठी आणि मानवी जीवन अधिक सुंदर करण्यासाठी आहे, हेच तत्त्व ते शिकवीत.

आजच्या आधुनिक काळात शिक्षकांची भूमिका बदलली असली तरी तिचे सार तेच आहे. आज माहितीच्या युगात प्रत्येकाकडे ज्ञानसाधने सहज उपलब्ध आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन शिक्षण इत्यादी. या सर्वांमुळे शिक्षकाचे काम केवळ माहिती पुरविण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. शिक्षकाला आता माहितीचे ज्ञानात, आणि ज्ञानाचे शहाणपणात रूपांतर करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा द्यावी लागते. डिजिटल युगात शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकवणारा नसून मार्गदर्शक, समुपदेशक, प्रेरणादाता आणि मूल्यसंस्कारक बनला पाहिजे. आधुनिक काळातील शिक्षकांची जबाबदारी बुद्धकालीन गुरूंहून अधिक व्यापक आहे. कारण आजची मुले केवळ परीक्षेतील गुणांसाठी शिकत नाहीत, तर त्यांना जागतिक स्पर्धेत टिकून राहायचे आहे. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांत सर्जनशीलता, नवोन्मेष, तर्कशक्ती, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि मानवी मूल्ये रुजवावी लागतात. जसे बुद्धकालीन शिक्षकांनी शिष्यांना प्रश्न विचारायला, संवाद साधायला आणि सत्य शोधायला प्रवृत्त केले, तसेच आजचे शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करायला आणि समस्या सोडवायला शिकवतात.

बुद्धकालीन संदर्भ आणि आधुनिक संदर्भ यांची तुलना केली तर अनेक साम्यस्थळे दिसून येतात. बुद्धकालीन शिक्षकांनी समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाचा वापर केला. आजचे शिक्षकही समाजातील पर्यावरण समस्या, हिंसा, डिजिटल व्यसन, सामाजिक माध्यमांचा गैरवापर, लिंगभेद, असमानता यांसारख्या प्रश्नांवर विद्यार्थ्यांना संवेदनशील करतात. त्या काळात शिक्षकांनी शिष्यांना करुणा आणि समतेचे धडे दिले, तर आज शिक्षक विद्यार्थ्यांना मानवाधिकार, लोकशाही मूल्ये आणि शाश्वत विकास यांची जाण देतात. तथापि, आधुनिक शिक्षक अनेक आव्हानांशी सामना करीत आहेत. ग्रामीण भागातील शाळांची अपुरी साधनसामग्री, करारावर काम करणाऱ्या शिक्षकांची असुरक्षितता, प्रशासकीय कामाचा ताण, डिजिटल साधनांच्या अभावामुळे शिकवण्यातील अडचणी यामुळे शिक्षकांचे कार्य जड झाले आहे. तरीही जे शिक्षक आपले काम ध्येय मानतात, तेच खऱ्या अर्थाने बुद्धकालीन गुरूंच्या वारशाला न्याय देतात. जागतिक शिक्षक दिनाचा खरा अर्थ म्हणजे शिक्षकांच्या योगदानाची दखल घेणे आणि त्यांच्या कार्याला योग्य सन्मान देणे. बुद्धकालीन संदर्भ सांगतो की शिक्षक हा केवळ माहिती देणारा नसून मूल्यांचा वाहक आहे. आधुनिक संदर्भ सांगतो की शिक्षकाला नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत विद्यार्थ्यांना सुसंस्कारित नागरिक घडवावे लागते. म्हणूनच आज आपल्याला या दोन्ही परंपरांचा संगम साधावा लागेल. ५ ऑक्टोबर रोजी असणारा जागतिक शिक्षक दिनानिमित्त आपण ठरवायला हवे की आपल्या शिक्षणव्यवस्थेत बुद्धकालीन मूल्यांचा व आधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालावा. शिक्षकांना योग्य प्रशिक्षण, संसाधने, मानवी सन्मान आणि प्रेरणा द्यावी. कारण राष्ट्राचे भविष्य शिक्षकांच्या हातात आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा वैज्ञानिक, नेता, समाजसुधारक, विचारवंत होणार आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ वर्गखोल्यांपुरती मर्यादित नसून समाजपरिवर्तनाची आहे. म्हणून आपण या दिवशी केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते न थांबता शिक्षकांना खरे समर्थन द्यावे, त्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहावे आणि शिक्षण अधिक न्याय्य, मूल्याधिष्ठित आणि समाजाभिमुख करण्यासाठी प्रयत्न करावे. बुद्धकालीन गुरूंनी दिलेली प्रेरणा आणि आधुनिक शिक्षकांचे ध्येय हे दोन्ही एकत्र केल्यासच मानवतेचे खरे कल्याण साध्य होईल.



–डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## स्व.काकूंचे जीवन...

आधार देणारी परोपकारी महिला म्हणून काकूंचा आदर्श घेण्यासारखा आहे. संपूर्ण आयुष्य त्यांनी परोपकारी म्हणून जगले. जगातले सर्वात मोठे तीर्थक्षेत्र म्हणजे आई आणि वडील आहेत आधी त्यांची सेवा करा बाकीचे पुण्य आपोआप पदरात पडेल. तीर्थालाही पवित्र करणारी सेवा म्हणजे माता–पित्याची सेवा आहे. भक्त पुंडलिकाच्या भक्तीला भारावून जगाचा बाप आजही पंढरपुरात उभा आहे हे माता–पित्यांचे प्रेम आज जगाला प्रेरणा देणारे आहे. जेव्हा चांगले दिवस येतात तेव्हा आईबाप जिवंत नसतात ज्यांचे आहेत ते भाग्यवान आहेत पण काही कारटे आपल्या आई बापाला वार्यावर सोडून देतात जन्मदात्याच्या आनंदात जो आपला आनंद शोधतो त्याला देवाची सेवा करण्याची गरज नाही, आई–वडिलांचा आशीर्वाद आणि आनंद आयुष्यभर पुरतो त्यामुळे रडायचं असेल तर देवाजवळ रडा माणसा पुढे रडू नका देव मार्ग काढतो पण माणूस तुमची फुकटची प्रसिद्धी करतो जोपर्यंत जिवात जीव आहे तोपर्यंतच मनुष्याला किंमत असते त्यामुळे चांगले कर्म केले तर नाव होईल आणि कुकर्म केले तर बरं झालं हे गेलं अशी वाक्य ऐकायला येतील त्यामुळे परोपकारी जीवन जगून सदाचारी व्हा असे ते म्हणाले. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भप. नाना महाराज कदम, ह.भ.प. सुरेश महाराज, ह.भ.प. नवनाथ महाराज, ह.भ.प. अखंडानंद महाराज, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर, ह.भ.प. रामहरी महाराज, ह.भ.प. अभिमान महाराज, ह.भ.प. हरिभाऊ महाराज काळे, ह.भ.प. रोडे महाराज, ह.भ.प. अविष्कार महाराज, ह.भ.प. मोटे महाराज, ह.भ.प. परशुराम मराडे, ह.भ.प. जनार्दन महाराज तिळवणे, सुरेश क्षीरसागर, डॉ.सौ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.विठ्ठल क्षीरसागर, रोहित क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हर्षद क्षीरसागर, विजूताई महिंद्रे, बेबीताई भांडकर, विशाल क्षीरसागर, जगदीश काळे, दिनकर कदम, अरूण डाके, विलास बडगे, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, नानासाहेब काकडे, सुधाकर मिसाळ, बाबूशेठ लोढा, विलास विधाते, विनोद मुळूक, मुखीद लाला, अर्जुन बहीरवाळ, अंकुश राठोड, तानाजी कदम, राणा चौहाण, प्रमोद शिंदे, अरूण बोंगाणे, सखाराम मस्के, सुभाष क्षीरसागर, मनोज मस्के, बंडू निसर्गंध, गोरख दन्ने, मुन्ना फटाणे, अंबादास गुजर, भास्कर जाधव, शिवाजी जाधव, माधवराव मोराळे, शेख ईरफान, जमील भाई, रऊफ भाई जवारीवाले, बी.टी. बहीर, एस.टी. नखाते, आसाराम औसरमल, जमीलभाई, शेख पाशा भाई, चंद्रकांत पेंढारे, अशोक कुलकर्णी, स्वरूप राठोड, महादेव खोसे, जयश्रीताई विधाते, बालाप्रसाद जाजू, आमेर सिध्दीकी, ॲड. जयंत राख, ॲड.विष्णूपंत काळे, ॲड.राम दहिवाळ, ॲड.श्रीराम लाखे, ॲड.महेश गर्जे, ॲड.सदाशिव राहिंज, ॲड.अजय राख, ॲड.मुसा पटेल, ॲड.प्रशांत देशपांडे, ॲड, राजेंद्र राऊत, पत्रकार अशोक देशमुख, दिलीप खिस्ती, सुनिल क्षीरसागर, रवि उबाळे, बालाजी तोंडे, उदय जोशी, संजय मालाणी, जालिंदर धांडे, नारायण नागरे, नसीर पठाण, डॉ.भागवत मोटे, दादासाहेब मुंडे, भागवत तावरे, शारदाताई डुलगज, संजय होळकर, गोगो मिसाळ, नितीन साखरे, नामदेव दुधाळ, प्रा.लक्ष्मण गुंजाळ, नवनाथ कुलकर्णी, विठ्ठलराव साळूंके, दत्तात्रय शिंदे, अशोक शेटे, धनंजय वाघमारे, शुभम धूत, शुभम कातांगळे, दिनेश पवार, मिलिंद ठोकळ, जैतुल्ला खान, प्रेमलता चांदणे, बाबूराव राठोड, सतीश पवार, रविंद्र पवार, आशिष काळे, दत्तात्रय बारगजे, प्रा.दत्तात्रय आघाव, परमेश्वर सातपुते, राजेंद्र बन्सोडे, सुभाष संचेती, कलंदर पठाण, शालिनीताई परदेशी, कोमलताई राजपुत, निता कांबळे, सुजाता कांबळे, शेख शाकेरा, संगिताताई वाघमारे, शरद ढाकणे, सुभाष सपकाळ, विश्वांभर सावंत, रूस्तूम बेदरे, नागेश तांबारे, अशोक वीर, बाबूशेठ नहार, अतुल मौजकर, विष्णू वाघमारे, सुलेमान पठाण, मिनाताई उगलमुगले,

◆ पान १ वरून पुढे...

अमोल पौळ, नामदेव गायकवाड, मुन्ना ईनामदार, दिनेश परदेशी, विजय सरवदे, अक्षय रणखांब, हनुमान देवकते, अंकुश उगले, दिलीप शेळके, डॉ.महेशकुमार वनवे, राजु मुनोत, मन्मथआप्पा हेरकर, विठ्ठल गुजर, सतीष राठौर, कैलास मैड, हनुमान डहाळे, प्रकाश इंगळे, आत्माराम पवार, अरूण बरकसे, अरूण गोरे, नागेश शिंदे, बाबूराव केदार, पोपट शिरसाट, दिलीप बडे, मंगेश लोळगे, सतीश काटे, डॉ.गोपाल चौसाळकर, संजय लोणीकर, डॉ.किशोर वरपे, तुषार घुमरे, बाबू करांडे, सेवानंद कदम, भरत लोळगे, बबन डोईफोडे, शशिकांत माने, राहिदास रोहिटे, नंदकुमार कुटे, बिभीषण घुगे, बप्पासाहेब घुगे, कल्याण कुटे, सय्यद लुकमान, मारोती वाघ, प्रभाकर सानप, नवनाथ सानप, सुभाष धस, बाबूशेठ नहार, नवनाथ घोडके, बंडू घुमरे, प्रशांत लांडे, ओमप्रकाश खवतड, उध्दव म्हेत्रे, माणिक वाघमारे, रमाकांत मुंडे, गणेश राऊत, संजय सानप, सर्जेराव खटाणे, गहिनीनाथ पाखरे, सुर्यकांत माने, विश्वास आखाडे, जयश्रीताई मुंडे, पांडूरंग भोसकर, भिमराव नरवडे, शंकर काशिद, शहादेव सदाफुले, डॉ.अरूण भस्मे, डॉ. राजा मचाले, एम.ए. राऊत, योगेश पवार, गोविंद साळूंके, सचिन भोज यांच्यासह महिला पुरूषांची उपस्थिती होती.

## राज्यातील सर्व....

वितरणाच्या राज्य रोजगार मेळाव्याच्या राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा (विदर्भ व तापी व कोकण खोरे विकास महा.), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पणन, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार परिणय फुके, आमदार अबु आझमी, आमदार मनोज जामसुतकर, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, कोकण विभागीय आयुक्त विजयकुमार सुर्यवंशी, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार आदी मान्यवर उपस्थित होते.

## पत्नीला कारमध्ये....

रवींद्र शिंदे हे पोलिस उपनिरीक्षक म्हणून २०१३ साली बीड पोलिस दलात भरती झाले. पीडिता आणि शिंदे हे शेजारीच राहत असल्याने ओळख झाली. नंतर तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून अत्याचार केला. बीडहून शिंदे यांची बदली धाराशिवला झाली. परंतु त्याने त्रास देणे सोडले नाही. पिस्तूलचा धाक दाखवून त्याने जून आणि जुले २०२५ मध्ये पीडितेवर घरात घुसून अत्याचार केला. तसेच तिला मारहाणही केली. यात पीडिता गर्भवतीही राहिल्याची माहिती आहे. याप्रकरणी जुलै महिन्याच्या अखेरीस शिवाजीनगर पोलिस ठाण्यात शिंदेविरोधात अत्याचारासह इतर कलमांन्वये गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून तो फरारच आहे. शिवाजीनगर पोलिसांनी त्याच्या अटकेसाठी कोणतेही प्रयत्न न करता त्याला अभय दिल्याचा आरोप पीडितेच्या पतीने केला. शुक्रवारी नेमके काय घडते? पीडिता आणि रवींद्र शिंदे हे कारमधून (एमएच २३ बीसी ३४०२) बीड शहरातील भाग्य नगर भागात होते. पीडितेच्या पतीने पाहताच पाठलाग केला. तुळजाई चोक, नगर नाका, बसस्थानक मार्गे बाहेर जाण्यापूर्वीच पतीने दुचाकी आडवी लावून शिंदेला खाली खेचले. त्याला कपडे फाटेपर्यंत बदडले. पीडिताही तोंड बांधून तेव्हा कारमध्येच बसलेली होती. तसेच शिंदेही तोंड बांधून होता. त्यानंतर पीडितेच्या पतीने शिवाजीनगर पोलिस ठाणे गाठत शिंदेविरोधात तक्रार दिली.

फरार; तरीही पोलिसांसमोरून पळाला– शिंदे हा अत्याचाराच्या गुन्ह्यात

◆ पान १ वरून पुढे...

फरार आहे. असे असतानाही तो बीडमध्ये येऊन पीडितेला घेऊन फिरत होता. शुक्रवारी दुपारीही पोलिसांनी हा वाद मिटवला. पीडितेसह पतीला पकडले. परंतु आरोपी असलेल्या एपीआय विदिला अभय दिले. त्यामुळे त्याने तेथून धूम ठोकली. शिंदे हा आरोपी आहे, हे माहीतच नाही, असा खुलासा पोलिसांनी केला. तर शिवाजीनगर पोलिसांनी यावर तोंडावर बोट ठेवले. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पीडिता तीन दिवसांपासून गायब– पीडिता ही तीन दिवसांपासून घरी आली नव्हती. त्यामुळे पीडितेच्या पतीला संशय आला. शुक्रवारी दुपारी तो खरा ठरला. त्याने पीडिता आणि एपीआय शिंदे यांना कारमध्ये रंगेहाथ पकडले. त्यानंतर दोघेही शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गेले. पीडितेने शिंदविरोधात तक्रार देण्याऐवजी पतींवरच आरोप केले. परंतु पोलिसांना सर्व माहिती असल्याने त्यांनी तिला शांत केले. त्यानंतर तिच्या पतीच्या तक्रारीवरून एपीआय शिंदेविरोधात गुन्हा दाखल केला.

## पिंजरा फेम....

अप्रतिम अभिनय आणि नृत्यकौशल्याने प्रेक्षकांच्या मानावर एक वेगळी छाप पाडली. 'झनक झनक पायल बाजे', 'दो आंखें बारह हाथ' आणि विशेषत: 'पिंजरा' चित्रपटामधील त्यांची अजरामर भूमिका प्रेक्षकांच्या मनात कायम स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो !

## आ.सुरेश धस...

प्रयत्नशील आहे. या दोन उपकेंद्रांच्या मंजुरीमुळे मतदारसंघातील अनेक गावांना दीर्घकालीन लाभ होणार असून हे काम म्हणजे शेतकऱ्यांसाठी मिळवलेले एक ठोस यश आहे. या योजनेच्या माध्यमातून आष्टी विधानसभा मतदारसंघात सौर ऊर्जेवर आधारित कृषी क्रांती घडविण्याकडे एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याचे शेतकरी व स्थानिक नागरिकांकडून भावना व्यक्त होत आ.सुरेश धस यांचे आभार मानले जात आहे.

## जाहिराती देत...

उधळपट्टी करतात. अगदी गल्ली बोळात निवडणुक काळात हीच मंडळी लाखो रूपये रेवड्या–फुटाणे वाटावेत तसे वाटतात. परंतु त्यांना मोठे करणार्या वृत्तपत्रांकडे कानाडोळा करतात. वृत्तपत्राचा वर्धापन दिन असेल, दीपावली अंक असेल अथवा नेत्यांचे वाढदिवस असतील जाहिराती देण्याचे टाळतात. काही नेते जाहिराती देतात बिले देत नाहीत. तर दुसरीकडे लावणी महोत्सव साजरे करून बायका नाचवायच्या व कोट्यवधीचा खर्च करायचा असेही काही नेत्यांचे धंदे आहेत. तर काही नेते तर स्वत:ला राष्ट्रीय नेते म्हणवून घेतात व नुसते गोड बोलतात. गोड बोलण्याने वृत्तपत्रे चालत नाहीत किंवा तुमच्या मोठेपणाच्या कोरड्या आश्वासनावर सुद्धा वृत्तपत्रे चालत नाहीत. वृत्तपत्राच्या खर्चाचा विचार केल्यास आज अनेक पटींनी खर्च वाढलेला आहे. तीन–पाच रूपयात काय मिळते? वृत्तपत्रे सामान्य माणसांचा आजही मोठा आधार आणि विश्वास आहे. सामान्य माणूस मग तो ग्रामीण भागातील असो की शहरी माणुस असो तो आजही लाखोंच्या संख्येने वृत्तपत्रांचे वाचक आहेत. आम्ही छापलेल्या बातम्या त्यांच्यापर्यंत पोचतात. अजूनही सामान्य जनतेचा छापील वृत्तपत्रावर व त्यातील बातम्यावरच विश्वास आहे आणि म्हणुन ही सर्व मराठी वृत्तपत्रे ठामपणे उभी राहणे आवश्यक आहे. म्हणून नेते व कार्यकर्त्यांच्या जाहिरातरूपाने सहकार्याची अपेक्षा आहे. परंतु जे नेते व कार्यकर्ते मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. स्थानिक वृत्तपत्रांना जाहिराती देत नसतील त्यांच्या बातम्यावर बहिष्कार टाकण्याचा व त्यांच्या बातम्या छापण्यास टाळण्याच्या बीडच्या संपादकांनी आपापसात संवाद करून निर्णय घेतला आहे. लवकरच सर्व संपादकांची बैठक बोलावली जाणार असल्याचे संयोजकांनी म्हटले आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## धनंजय मुंडे....

कुटुंबीय न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. स्वर्गीय यश ढाका याच्या सर्व मारेकऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा केली जावी यासाठी आपण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून, तुमच्या या लढाईत तुम्ही स्वतःला एकटे समजू नका, कुणालाही घाबरू नका, मी न्यायाच्या या लढाईत तुमच्या पूर्ण शक्तीने पाठीशी उभा आहे असे धनंजय मुंडे यांनी यश ढाका च्या आई वडिलांशी बोलताना म्हटले. यावेळी पत्रकार देवेंद्र ढाका व त्यांच्या कुटुंबीयांच्या भावना अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान या प्रकरणात पोलिसांकडून केल्या जात असलेल्या तपासाची धनंजय मुंडे यांनी पोलीस अधीक्षकांची चर्चा करून माहिती घेतली असून याबाबत आपण राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करणार असून, यशच्या कुणाच्या कटात सहभागी असलेल्या कुणालाही सोडले जाणार नाही, असे धनंजय मुंडे म्हणाले, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, ड. गोविंदराव फड, प्रदेश प्रवक्ते भागवत तावरे, अविनाश नाईकवाडे, विनोद हतांगळे, यांच्यासह ढाका कुटुंबीय व नातेवाईक आदी उपस्थित होते.

## बीडमधील वंजारी-...

चळवळ बहरते आहे. इथल्या गावखेड्यांत सामाजिक सलोखा टिकून आहे. आजही इथली माणसे एकमेकांवर प्रेम करतात,' असेही त्यांनी स्पष्ट केले. सरहद, पुणेच्या वतीने 'बीड वाचतंय' या अभियानांतर्गत डॉ. सतीश साळुंके यांना स्वामी रामानंद तीर्थ जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. त्या वेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांनी साळुंके यांच्याशी संवाद साधला. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, 'सकाळ' चे संपादक सम्राट फडणीस, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) उपसंचालक डॉ. प्रशांत खरात, 'सरहद'चे संजय नहार, शैलेश पगारिया, लेशपाल जवळगे आदी या वेळी उपस्थित होते. 'प्राचीन–मध्ययुगीन काळातील अनेक राज्यकर्त्यांनी बीडमध्ये मंदिरे, वास्तू, शिल्पे उभारली. बीडचे वाययीन जीवनही समृद्ध होते. ज्या काळात उर्वरित महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण होत होती, त्या वेळी बीडमध्ये विपुल साहित्य निर्माण झाले. वेगवेगळ्या जाती–धर्माचे संत, महापुरुष या भूमीत जन्मले. स्वातंत्र्याच्या लढाया उठाव, सामाजिक सुधारणा, सामाजिक सलोख्याच्या चळवळी बीडमधून सुरू झाल्याची अनेक उदाहरणे आहेत,' असे साळुंके यांनी सांगितले. ते म्हणाले, 'देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधीजींचे जे महत्त्व आहे, ते स्थान स्वामी रामानंद तीर्थ यांचे हैदराबाद मुक्तीसंग्रामात आहे. बीड जिल्ह्यातील २२ जणांनी स्वामी रामानंद तीर्थ । यांच्या नेतृत्वातील लढ्यात प्राणांची आहुती दिली. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्या घटना घडल्या, त्या सर्व घटनांची पुनरावृत्ती हैदराबाद मुक्तीसंग्रामात झालेली दिसते. हा लढा तुलनेने अधिक क्रूर होता. उठाव करणारे जिवंत जाळण्यात आले, गावागावात सार्वजनकरीत्या त्यांच्या बायकांची अब्रू लुटण्यात येत होती, दगड मारून त्यांचे मुडदे पाडले जात होते, सांगता येणार नाहीत असे अमानुष अत्याचार निजामाने आणि त्याच्या रझाकारांनी केले.' 'हैदराबाद मुक्तीसंग्राम हा धर्मनिरपेक्ष लढा'– 'हैदराबाद मुक्तीसंग्राम हा धर्मनिरपेक्ष लढा होता. तो जातीय लढा नव्हता. त्यात केवळ हिंदू होते, हे खोटे आहे. या लढ्यात आर्य समाज, अस्पृश्यांसह सर्व जाती–धर्मांच्या माणसांचा मोठा सहभाग होता. या लढ्याला जातीयतेचा रंग देण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र, तो प्रयोग स्टेट काँग्रेसने हाणून पाडला. हा लढा शेतकरी, कष्टकरी, कामगार, चेहरा नसलेल्या लाखो लोकांचा आहे,' असे डॉ. सतीश साळुंके यांनी सांगितले.

◆ पान ४ वरून पुढे...

## खरी ताकद...

ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांनी गुंफले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ' देवाचिया द्वारी उभा क्षणभरी ' या अभंगावर आपल्या मधुर वाणीतून निरुपण केले. यावेळी बोलताना ते म्हणाले, संसाराच्या जात्यात जीव जेव्हा भरडून निघतो तेव्हा हरीनामाचा आश्रय जर मिळाला तर त्याचे जीवन उन्नतीच्या मार्गावर जाते. ज्ञानोबा माऊलींचा हरिपाठ चिंतनीय आहे, त्यांचे चिंतन करा, मुखी हरीनाम जपा आणि आनंदी आयुष्य जगा असेही ते म्हणाले. यावेळी ढोक महाराजांनी विविध प्रमाण देऊन आपल्या किर्तनसेवेत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आपल्या गोड गळ्यातून अभंग रचना गाऊन त्यांनी उपस्थितांन खिळवून ठेवले. याप्रसंगी गायक तुळशिराम अतकरे, नामदेव बेद्रे, ईंद्रजित येवले, चव्हाण यांनी संगीत व गायन साथ दिली. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित, ह.भ.प. नामदेव महाराज, ह.भ.प. गिरी महाराज, एकलिंगेश्वर वारकरी शिक्षण विद्यालय, पाडळशिंगींचे संचालक राम महाराज वराट आणि त्यांचे विद्यार्थी यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य आणि महिला पुरुष भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुसऱ्या दिवशीच्या कथेला महिला भाविक भक्तांची गर्दी प्रचंड होती. हरीनामाच्या गजराने शिवनगरी दुमदुमली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजीराव (दादा) पंडित अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

## लढा दुष्काळाशी...

तोड नाही. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना आधार देत मदत केली.

◆ पान ४ वरून पुढे...

त्यानुषंगाने लढा दुष्काळाशी चळवळीचे प्रणेते ड. राज पाटील यांनी आज धाराशिव येथे खासदार ओमराजे निंबाळकर यांचा रोपटे आणि संत तुकाराम महाराज यांची गाथा भेट देऊन सन्मान केला. यावेळी मुंबईच्या आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब खंदारे, पत्रकार अशोक फपाळ, अभियंता निखील वीर आदींची उपस्थिती होती. ओमराजे निंबाळकर यांचा इतर राजकारण्यांनी आदर्श घ्यावा– ॲड. राज पाटील राजकारणलीकडे जाऊन धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तब्बल आठ दिवस पूरग्रस्त भागात जाऊन शेतकऱ्यांना मदत केली. दुःखितांची आसवे पुसली. इतर राजकारणी आलिशान गाडी, विमानातून नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. ओमराजे निंबाळकर यांचा आदर्श इतर राजकारण्यांनी घेण्याची गरज असल्याचे ॲड. राज पाटील यांनी सांगितले.

## अनुकंपा तत्वावरील...

होती. अशा या संवेदनशील विषयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून नवीन अनुकंपा धोरण तयार केले. त्याचाच परिणाम म्हणून आज अनुकंपा प्रतिक्षा यादीतील अनुकंपा उमेदवारांना एकाच वेळी नियुक्ती पत्रे देण्यात आली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या हाती घेतलेल्या कार्यक्रमातर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेण्यात आलेल्या लिपिक–टंकलेखक श्रेणीतील उमेदवारांना देखील नियुक्तीपत्रे देण्यात आली. आज आयोजित या मेळाव्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांच्या हस्ते महाराष्ट्र

◆ पान ४ वरून पुढे...

लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक–टंकलेखक संवर्गातील ६४ उमेदवार तसेच अनुकंपा तत्वावरील गट–क संवर्गातील ३६ आणि गट–ड संवर्गातील ०८ उमेदवार अशा एकूण १०८ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यास संबंधित उमेदवार व विविध विभागातील अधिकारी–कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## कपिलधारवाडीत जिल्हाधिकाऱ्यांची...

प्रत्यक्ष पाहणी केली . या वेळी ग्रामस्थ मंजुषाताई नवले , केशव शिंदे , ग्रा . पं . सदस्य मिठू शिंदे , रुद्र महाकले , संदीप नवले , अंकुश महाकले , चंद्रसेन महाकले , भिवा शिंदे तसेच महिला ग्रामस्थ सविता शिंदे , मनीषा शिंदे , लताबाई भोसले , सुमित्रा शिंदे , कासाबाई जाधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून परिस्थितीची माहिती घेतली. त्यांनी सांगितले की, हा प्रकार नेमका कशामुळे घडून आला यासाठी तांत्रिक समितीमार्फत तात्काळ तपासणी करण्यात येईल . त्यानंतर कायमस्वरूपी पुनर्वसन अथवा इतर उपाययोजना याबद्दल कार्यवाही करण्यात येईल . त्यांनी पुढे सांगितले की, ज्यांना नरेगा अंतर्गत मजुरीची कामे आवश्यक आहेत त्यांना तात्काळ कामे उपलब्ध करून दिली जातील . विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेत जाण्याची व्यवस्था शिक्षण विभागामार्फत केली जाईल . तसेच मन्मथ स्वामी देवस्थान येथे स्थलांतरित गावकऱ्यांची पूर्णतः व्यवस्था प्रशासनामार्फत करण्यात येईल . ग्रामस्थांनी प्रशासनाकडे मागणी केली की, डोंगर सरकल्यामुळे आमच्या घरांचे , शाळेचे व मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे मोठे नुकसान झाले

◆ पान ४ वरून पुढे...

आहे . प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलावीत , अन्यथा गावाच्या सुरक्षिततेवर मोठा प्रश्न उभा राहील. दसरा असूनही प्रशासनाने तातडीने पावले उचलत भेट दिली , जिल्हाधिकारी यांनी स्वतः ग्रामस्थांना आश्वस्त केले , यामुळे ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले .

## नंदकिशोर मुंदडा...

उघडकीस आले. नंदकिशोर मुंदडा यांनी आपल्या हवामानानुसार नागरिकांनी केलेल्या या मदत निधीचे कौतुक केले असून लवकरच हा निधी मुंबई येथे ना. पंकजा मुंडे यांच्या समवेत जावून मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये जमा करणार असल्याचे सांगितले.

## सोन्याची चैन...

गुंजाळ (रा. माऊली नगर, बीड) यास पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून एकूण १२ ग्रॅम सोन्याची चैन, किंमत अंदाजे ₹१,५२,०००/– रुपये असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस हवालदार १६०९ दुबाले, ४०२ मस्के, १३०२ गायकवाड, २०२९ सानप, पोलीस अंमलदार २२१५ अश्फाक, २२१० परजणे आणि २०६२ मांजरे यांनी सक्रिय सहभाग घेतला. हस्तगत मुद्देमाल व आरोपी यांना पुढील कार्यवाहीसाठी नेकनूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. या यशस्वी कारवाईबद्दल नागरिकांकडून पोलीस पथकाचे अभिनंदन केले जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com



*दसर्याच्या पुर्वसंध्येला बीड शहरातील सौभाग्य लॉन्स ऐथे रास दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे बीड तालुका अध्यक्ष विशाल इंगोले यांची कन्या कु. वंशिका विशाल इंगोले हिने मॉ कालीची वेशभूषा करून उपस्थितांची मने जिंकली.*

# राज्यातील पावसाबद्दल हवामान विभागाची महत्त्वाची अपडेट

## 'या' दिवसापासून राज्यात पावसाच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात

**मुंबई । प्रतिनिधी**

यंदा पावसाचा भारतासह राज्यात लांबलेला आहे. वेळेत दाखलेला मान्सून ऑक्टोबर महिन्याची सुरुवात झाली असली तरी परताना दिसत नाही. नवरात्रसह दसरा पावसात गेल्यामुळे आता दिवाळीचा शण पावसात जाणार का असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. मराठवाड्यासह सोलापूरमध्ये सप्टेंबर महिन्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. अतिवृष्टीमुळे मराठवाडा आणि सोलापुरात शेतकऱ्यांचा शेती पाण्यात तर असंख्य लोकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत. अशात मान्सून परतीच्या प्रवासा कधी सुरुवात करणार याबद्दल हवामान विभागाने महत्त्वाची अपडेट दिली आहे. ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी राज्यातून मान्सून माघारी कधी सुरु करणार याबद्दल सांगितलं आहे. त्यांनी सांगितलं की, गुजरातमध्ये परतीचा पाऊस कोसळत असून तो मुंबईसह महाराष्ट्रात ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान बरसणार आहे. याचा अर्थ येत्या सोमवारी ६ ऑक्टोबरला पावसाचा परतीच्या प्रवासाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे या दिवसांमध्ये महाराष्ट्रात ठिकठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर १२ ऑक्टोबरनंतर महाराष्ट्रातून मान्सून पूर्णपणे माघार जाणार असून दिवाळी पावसाशिवाय साजरी करता येणार आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे. तर राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले असून, पुढील तीन दिवस काही भागात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या दिवसांमध्ये विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा शक्यता आहे. तर इतर भागात पावसाची उघडीप राहणार आहे.

मागील काही दिवसांपासून राज्यात पावसाचा जोर कमी झालाचा पाहिला मिळाला आहे. अधूनमधून हलक्या सरी येत आहेत. मात्र, मुसळधार पावसाची शक्यता नसल्याचा ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितलं आहे. अंदाजानुसार, मध्य भारत आणि महाराष्ट्राच्या काही भागात दुसऱ्या आठवड्यात पावसाची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र अरबी समुद्रात दाखल झाल्यामुळे 'शक्ती' चक्रीवादळ निर्माण झालं आहे. मुंबईपासून ८०० सागरी मैलांवर गुजरातपासून पश्चिम-दक्षिण दिशेला हे वादळ असून ७ ऑक्टोबरपर्यंत हे वादळ गुजरातकडे सरकणार आहे, असं हवामान विभागाने सांगितलं आहे. मात्र, तोवर त्याचा जोर कमी होईल असही सांगण्यात आलं आहे. मुंबईला या वादळाचा धोका नसल्याचं हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनी स्पष्ट केलं आहे.




## थोडक्यात...

# पिंपळनेरकरांनी लुटले दसऱ्याचे सोने

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

'उत्सव आला विजयाचा, दिवस सोने लुटण्याचा... नवे-जुने विसरून सारे, फक्त आनंद वाटण्याचा..' अशा शुभेच्छा एकमेकांना देत पिंपळनेरकरांनी अतिशय पारंपरिक पद्धतीने दसरा सण गुरुवारी उत्साहात साजरा केला. पहाटेपासून शहरात दसरा सणाचे वातावरण दिसून आले. घरोघरी वाहनांची , आपल्या दैनंदिन उपयोगातील साधनसामुग्रीची पूजा करण्यात आली. त्याचप्रमाणे आशापूरक गणेश मंदिरासह अन्य मंदिरांमध्ये नागरिकांनी देवाचे दर्शन घेतले .दसऱ्याच्या निमित्ताने नातेवाईक मित्रांना आपट्यांची पाने देऊन शुभेच्छा देण्यात आल्या . दसऱ्याच्या मुहूर्तावर फुल बाजारात झेंडू फुलांची मोठ्या प्रमाणात उलाढाल झाली. त्याचप्रमाणे अनेक भागात देखील विविध ठिकाणी झेंडू फुलांच्या विक्रीचे स्टॉल्स लागले होते. त्या ठिकाणी देखील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची फुलांसह, तोरणांची, आपट्यांच्या पानांची खरेदी केली . यंदा गुरुवारी दसरा आल्याने बुधवारी अनेक कार्यालयात दसरा साजरा करण्यात आला. त्यामुळे एक दिवस आधीच दसऱ्याची चाहूल लागली होती. दरम्यान गुरुवारी सकाळपासूनच मिठाईच्या दुकानात श्रीखंड, बासुंदी सह अन्य पदार्थ घेण्यासाठी नागरिकांची गर्दी झाल्याचे दिसून आले. दसऱ्याच्या स्वागतासाठी महिलांची पहाटेपासूनच लगबग सुरू होती. दारी रांगोळ्या काढल्या. विजयादशमीचा आनंद साजरा करण्यासाठी गृहिणींनी गोडधोडाच्या स्वयंपाकाचा बेत आखला होता दुपारनंतर खऱ्या अर्थाने खरेदीचा माहोल दुकानामध्ये दिसून आला. टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, होम थिएटर आदी वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

## आज स्व.पांडुरंग गोरकर यांना पेन्शनर्स संघटनेच्यावतीने श्रध्दांजली सभेचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

हाडाचा शिक्षक म्हणून मार्गदर्शन, गरज पडेल तिथे वकीलीचे काम आणि पेन्शनर्ससाठी हाताला धरून योग्य ते सहकार्य, पाठपुरावा करण्याचा सेवाभावी स्वभाव जपणारे स्व.पांडुरंग गोरकर यांचे काही दिवसापूर्वी दु:खद निधन झाले. पेन्शनर्स ॲण्ड सिनीयर सिटीझन संघटनेच्यावतीने त्यांना आज रविवार दि.५ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं.५ वा. पेन्शन भवन कार्यालय, सांगली अर्बन बँक, स्टेडीयम रोड बीड येथे भावपूर्ण श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. स्व.पांडुरंग गोरकर सरांनी आपल्या नंतरही आपलं कार्य अखंड सुरू राहावे अशी त्यांची भावना होती आणि तसेच नियोजन ठेवणारे ते होते. त्यांनी घडवलेले विद्यार्थी, आपलं आदर्श, यशस्वी कौटुंबिक आयुष्य, सहवासात आलेले सर्व आणि चांगल्या कार्यासाठी विना मोबदला केलेली वकिली आणि गरजवंतांना तसेच सेवानिवृत्तांना दिलेला मदतीचा हात हा पुढच्या पिढीसाठी देखील खूप मौलिक ठेवा आहे. म्हणून पेन्शनर्स ॲण्ड सिनीयर सिटीझन संघटनेच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करणार आहे. या श्रध्दांजली सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.

## सौ. के.एस.के. महाविद्यालयात लोकनेत्या मा.खा. केशरबाई क्षीरसागर यांची पुण्यतिथी निमित्त अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात लोकनेत्या माजी खासदार स्व. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू यांना एकोनिसाव्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# लोकनेत्या स्व. केशरकाकु क्षीरसागर यांच्या स्मृतिदिनानिमित्त लिंबागणेश ग्रामपंचायतीत अभिवादन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या आधारवड, लोकनेत्या स्व. केशरकाकु क्षीरसागर यांच्या १९व्या स्मृतिदिनानिमित्त आज दि. ०४ ऑक्टोबर रोजी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस काकुंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच बालासाहेब जाधव होते. प्रमुख उपस्थितीत माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळकृष्ण थोरात, समीर शेख, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, माजी उपसरपंच शंकर वाणी, शिवाजी रणखांब, दादा गायकवाड, गणपत तागड, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वाणी, रामदास मुळे, दिलीप ढास, सिताराम थोरात, सुंदर थोरात, तुकाराम गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभार प्रदर्शन बाळासाहेब मुळे यांनी केले. या वेळी बोलताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले की, महिलांना 'चुल आणि मुल' या चौकटीत बांधून ठेवणाऱ्या काळात, प्रस्थापितांना मागे सारून समाजकारण, शिक्षण, आणि औद्योगिक क्षेत्रात लौकिक गाजविणाऱ्या काकुंचे कार्य हे आजही प्रेरणादायी आहे. त्यांनी ऊसतोड मजुरांच्या आर्थिक उन्नतीसाठी आशिया खंडातील पहिल्या साखर कारखान्याच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका निभावली. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी 'आदर्श' आणि 'नवगण' संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा घराघरांत पोहोचवली.



## तलवाडा येथील जेष्ठ नागरिक रघुनाथ(मामा) वाघमारे यांना पत्नी शोक



**तलवाड़ा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील जेष्ठ नागरिक रघुनाथ (मामा) वाघमारे यांच्या पत्नी बौद्धवासी तारामतीबाई रघुनाथ वाघमारे यांचे नुकतेच दिर्घ आजाराने पुणे येथे निधन झाले असून तलवाडा येथील सर्व परिचित आसलेले सेवानिवृत्त महावितरण कर्मचारी रघुनाथ(मामा) वाघमारे यांच्या त्या पत्नी होत्या तर माजी जि. प.सदस्य युवराज तात्या डोंगरे यांच्या त्या भगीणी होत्या. विषेश म्हणजे तारामतीबाई यांचे माहेर आणी सासर तलवाडा हेच आसल्याने मोठ्या प्रमाणात नातलगाची या वेळी उपस्थिति जाणवली. बौद्धवासी तारामतीबाई ह्या गेल्या काही दिवसांपासुन दिर्घ आजारी होत्या काल सांय. ४ वाजता पुणे येथे उपचारा दरम्यान त्या बौद्धवासी झाल्या. त्यांच्या पश्चात पती रघुनाथ (मामा) वाघमारे, मुले, मुली, सुना, जावई, नात, नातु भांवड आसा मोठा परिवार आहे. वाघमारे परिवाराच्या दु:खात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सामिल आहे.

# जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## विद्यार्थ्यांकडून घेतली फार्मासिस्टची शपथ,आरोग्य शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य एज्युकेशन ग्रुपतर्फे आदित्य फार्मसी कॉलेजच्या सभागृहात संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय क्षेत्रात फार्मासिस्टची भूमिका, औषधांचा नैतिक आणि तर्कसंगत वापर तसेच फार्मसी क्षेत्रातील व्यापक संधी या विषयांवर हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांकडून फार्मासिस्टची शपथ घेण्यात आली. आरोग्य शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बीडचे सहाय्यक आयुक्त डॉ. एम.जे. निमसे म्हणले डॉक्टर हे मानवी जीवनाचे आधारस्तंभ असले तरी फार्मासिस्ट हे असे व्यावसायिक आहेत जे त्या आधारस्तंभाला बळ देतात. औषधांचा नैतिक वापर आणि रुग्णांच्या हिताचा विचार ही फार्मासिस्टची खरी जबाबदारी आहे. आजच्या काळात फार्मसी क्षेत्राची व्याप्ती रेल्वे बोर्ड, लोकसेवा आयोग तसेच विविध सरळसेवा भरती मंडळांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे असल्याचे त्यांनी सांगितले.



**विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी**

**जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य एज्युकेशन ग्रुपतर्फे विद्यार्थ्यांची दंत तपासणी शिबिर, बीएमआय तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरांना विद्यार्थ्यांसह उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या वतीने विद्यार्थांच्या शिक्षणाबरोबर त्यांच्या आरोग्याचीही काळजी घेण्यात आली.**

कार्यक्रमाचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासन, बीडचे सहाय्यक आयुक्त डॉ. एम.जे. निमसे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला आदित्य एज्युकेशन ग्रुपचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांचे विशेष प्रोत्साहन लाभले. औषधनिर्माण संस्थेचे प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे, आदित्य इंजिनीरिंग कॉलेज चे प्राचार्य डॉ.बहादुरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. राहुल खडके, आदित्य डी. एड. कॉलेजच्या प्राचार्या बावणे मॅडम यांच्यासह आदींची उपस्थित होती. डॉ. सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना फार्मसी पदवीमुळे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी अचूक रणनीती आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच स्पर्धा परीक्षांसाठी महाविद्यालयात पूरक वर्ग सुरू करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. समीर देशमुख यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. तसेच फार्मासिस्टची शपथही विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मोराले यांच्यासह प्राध्यापक मुळे, प्रा. संजय जाधव, प्रा. वाघमोडे, प्रा. पवार, प्रा. खाडे, प्रा. सानप आदींनी परिश्रम घेतले. प्रा. समीर देशमुख यांनी आभार मानले.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७४/२०२५**
**महेंद्र मारोती बांगर विरुध्द ग्रा.पं.कार्या. खंडाळा**

पहा,
१. महेंद्र मारोती बांगर, रा. खंडाळा, ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक नंदिनी महेंद्र बांगर यांचा दिनांक १०/०४/२०१६ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा, ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा, ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/१०/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७५/२०२५**
**मच्छिंद्र नवनाथ पवार विरुध्द ग्रा.पं.कार्या. खंडाळा**

पहा,
१. मच्छिंद्र नवनाथ पवार, रा. खंडाळा, ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक ओमप्रकाश मच्छिंद्र पवार यांचा दिनांक ०५/०६/२०१९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा, ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा, ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/१०/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७६/२०२५**
**विष्णु तुळशीराम बरडे विरुध्द ग्रा.पं.कार्या. खंडाळा**

पहा,
१. विष्णु तुळशीराम बरड, रा. खंडाळा, ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक वेदिका विष्णू बरडे यांचा दिनांक २७/०३/२०१९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा, ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा, ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/१०/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७७/२०२५**
**बाळासाहेब मोहन पवार विरुध्द ग्रा.पं.कार्या. खंडाळा**

पहा,
१. बाळासाहेब मोहन पवार, रा. खंडाळा, ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक आर्वी विठ्ठल पवार यांचा दिनांक १५/०६/२०१९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा, ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा, ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/१०/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२५ • पान ४

# खरी ताकद हरीनामात आहे, मुखी हरी नाम जपा: ह.भ.प. रामराव महाराज ढोक

### • शिवनगरी हरीनामाने दुमदुमली

**गेवराई । प्रतिनिधी**

सर्वसामान्य माणसांच्या उद्धारासाठी ज्ञानोबा माऊलींनी २७ अभंगाचा हरीपाठ निर्माण केला. तो अतिशय सोपा आणि सामान्य माणसांना कळणारा आहे. खरी ताकद हरीनामात आहे, हरीनामातच आपले कल्याण आहे, त्यामुळे मुखी हरीनाम जपा असे भक्तीमय आवाहन ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांनी केले. जेष्ठ नेते शिवाजीराव दादा, या आपल्या लाडक्या नेत्याच्या आयुष्यात आणि परिवारावर कसलेही अरिष्ट येऊ नये, त्यासाठी भक्तीच्या ईस्टमय अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन गेल्या चार वर्षांपासून कार्यकर्त्यांनी केले आहे असे





गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित किर्तन महोत्सवात ते बोलत होते. गेवराई शहरातील शिवनगरीत माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा आणि कीर्तन सोहळ्यात किर्तनसेवेचे पहिले पुष्प

► उर्वरित पान २ वर

### • भजन सम्राट तुळशीराम आतकरे यांची अभंगवाणीने भक्ती रस भरला

सायंकाळच्या सत्रात भजनसम्राट यांची अभंगवाणी कार्यक्रम चांगलाच रंगला. यावेळी त्यांनी विविध अभंग सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी त्यांना तबल्यावर जाधव संभाजीनगर, हार्मोनियमवर भरत लोळगे यांनी संगीत साथ दिली. माधव चाटे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### • कथेतून घरी जाताना कांहीं तरी घेऊन जा: भागवताचार्य समाधान महाराज शर्मा

आपल्या सुमधूर वाणीतून भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत खिळवून ठेवले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, जोपर्यंत तुम्ही दुसऱ्या बद्दल चांगले बोलणार नाही, तोपर्यंत तुमचे चांगले होणार नाही, हे तुमच्या तुमच्या चांगल्यासाठी सांगतोय. भागवत कथा जीवनातील व्यथा दुर करणे, तेंव्हा कथेतून घरी जाताना कांहीं तरी चांगले घेऊन जा अखंडित सेवा करणारा हा पंडित परिवार आहे, आणि त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी हा भक्तीचा सोहळा आयोजित केला असल्याचे ते यावेळी म्हणाले.

## थोडक्यात...

### गोरक्षनाथ टेकडीवर राजेंद्र महाराज चोरडिया यांचे कीर्तन




**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील दुसऱ्या पुण्यतिथी आश्विन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी (ता. जि. बीड) येथे धार्मिक वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणून मंगळवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ह.भ.प. राजेंद्र महाराज चोरडिया (संभाजीनगर) यांचे कीर्तन होणार आहे. या कीर्तनाद्वारे संत विचारांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. पुण्यतिथी निमित्त सकाळी ८ वाजता बाबांचा पालखी सोहळा निघणार असून, सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणा पार पडणार आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, यासाठी समस्त गावकरी देवळा यांनी पुढाकार घेतला आहे. या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतकृपेचा लाभ घ्यावा, असे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ महाराज यांनी आवाहन केले आहे.

### आंतरराष्ट्रीय मास्टर्स स्पर्धेसाठी डॉ.संतोष कदम यांची निवड

#### दुबईत होणाऱ्या ४५ वर्षांवरील व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात



**बीड । प्रतिनिधी**

दुबई मुहसिंहा येथील इनडोअर स्टेडियम मध्ये १८ ते २३ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर्स व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी अंबाजोगाई येथील योगेश्वरी क्रीडा मंडळाचे खेळाडू डॉ.संतोष कदम यांची भारतीय संघात निवड झाली आहे. दुबई येथे होणाऱ्या या मास्टर्स आंतरराष्ट्रीय स्पर्धे साठी भारतासह स्पेन,पोलंड, युयेई, पाकिस्तान, फिलिपाईन्स, नेपाळ व युरोपियन युनियन संघाचा समावेश असणार आहे.पुणे येथे झालेल्या मास्टर्स व्हॉलीबॉल स्पर्धेतून संतोष कदम यांची निवड झाली आहे.या संघात महाराष्ट्रासह केरळ,कर्नाटक,दिल्लीच्या खेळाडूंचा समावेश आहे.यापूर्वी त्यांनी अनेकवेळा राष्ट्रीय व राज्य स्पर्धेत चमकदार कामगिरी केली असून राज्य व विद्यापीठ संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. अश्वमेध क्रीडा स्पर्धेतील पहिले उत्कृष्ट खेळाडू आहेत. महाराष्ट्र संघाचे व विद्यापीठाचे प्रशिक्षक व निवड समिती सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या निवडीचे कौतुक योगेश्वरी क्रीडा मंडळाचे सर्व सभासद यांच्यासह व्हॉलीबॉल खेळाडूंनी केले आहे.

### गावकऱ्यांच्या वतीने गुणवंतांचा सत्कार



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथील गुणवंत विद्यार्थी डॉ. रेणुका महादेव खेत्री, डॉ.सचिन विष्णू खेत्री, डॉ.अक्षय लक्ष्मण खेत्री यांनी बी.एच.एम.एस. ही पदवी प्राप्त केली. याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा दि.३ आक्टोंबर शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला. तालुक्यातील मोठेवाडी येथील संत सावता महाराज मंदिरात नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री हे होते तर डॉ. रामेश्वर जंगले,विश्वनाथ खेत्री, विष्णु खेत्री, नाथाराव खेत्री, अंगद खेत्री, भारत खेत्री, प्रभाकर खेत्री सुदर्शन हिवरकर, सुभाष सर्जे, विलास खेत्री, भगवान पवार, गजानन गोंडे, चक्रधर हिवरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमेश्वर हिवरकर यांनी तर आभार लक्ष्मण खेत्री यांनी मानले. मोठेवाडी येथील शेतकरी कुटुंबातील मुलांनी वैद्यकीय क्षेत्रातील पदवी संपादन केली, त्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचा नागरी सत्कार केला. या आयोजक समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री यांच्यासह गावकऱ्यांचा सहभाग होता, या सत्कार सोहळ्यात, गावकऱ्यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांसोबत त्यांचे आई -वडील पालक यांच्यासह त्यांचा सत्कार करुन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे कौतुक केले, आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**नेकनूर । प्रतिनिधी**

दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ढास.डी.के.मुख्य उपस्थितीमध्ये डॉ.मकबूल सलीम शेख सर व सांस्कृतिक विभागाचे प्राध्यापक मुजावर.एस.टी. हे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे मुजावर सर यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या एकूणच आयुष्यावर मार्गदर्शन केले व आजही त्यांच्या मार्गदर्शक तत्वांची व आयुष्यातील कर्तृत्वाची समृद्ध भारतासाठी गरज असल्याचे प्रतिपादन केले तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ढास डी.के. यांनी अध्यक्षीय समारोप करताना असे म्हणाले की, दोन्ही राष्ट्रपुरुष हे आपल्या देशाच्या जडणघडणीतील अनमोल मोती असल्याचे प्रतिपादन केले व त्यांच्यापासून पुढील पिढ्यांनी नक्कीच मोलाचे मार्गदर्शन प्राप्त करून आपले आयुष्य देशासाठी व समाजासाठी वाहिले पाहिजे असे प्रतिपादन केले प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक रामरूले डी. के. तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक ईनकर व्ही.एस.यांनी मानले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थेरल्याचे सरपंच बाळासाहेब राख व कुटुंबियांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

### • आशिष राख याचे अपघातात झाले होते निधन

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील थेरला गावचे सरपंच बाळासाहेब राख यांचा तरुण मुलगा तथा धनंजय मुंडे यांचे जुने सहकारी अप्पासाहेब राख यांचा पुतण्या आशिष याचे काही दिवसांपूर्वी रस्ते अपघातात दुःखद निधन झाले होते. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज थेरला येथे जाऊन राख कुटुंबियांचे भेटून सांत्वन केले.



आशिष राख या उमद्या तरुणाचा रस्ते अपघातात दुर्दैवाने मृत्यू झाल्याने राख कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात सहभागी होत धनंजय मुंडे यांनी कुटुंबाला धीर देत आधार दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, विठ्ठल सानप, ॲड. गोविंदराव फड, सतीश बडे, अविनाश नाईकवाडे यांसह पदाधिकारी तसेच राख कुटुंबीय उपस्थित होते.

### लढा दुष्काळाशी चळवळीतर्फे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचा सन्मान



**वडवणी । प्रतिनिधी**

धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पूरग्रस्त भागात जे काम केले आहे त्याला तोड नाही. त्यानुषंगाने लढा दुष्काळाशी चळवळीच्या वतीने सन्मान करण्यात आला. सामान्य माणसांशी थेट कनेक्ट खासदार अशी देशभर ख्याती असलेले खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पूरग्रस्त भागात जे काम केले त्याला

► उर्वरित पान २ वर

## अनुकंपा तत्वावरील व लिपिक श्रेणीतील जिल्ह्यातील १०८ उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरण

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत अनुकंपा तत्वावरील गट-क संवर्गातील उमेदवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक-टंकलेखक संवर्गातील उमेदवारांना आज नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात आज आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक,



तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एम.एस.साळवे, जिल्हा कोषागार अधिकारी लहू गळगुंडे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रवी तोंडे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रविण उखळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शासकीय सेवेत असतांना कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी अथवा अपत्याला नोकरी दिली जाते. परंतू, तांत्रिक कारणे किंवा काही प्रशासकीय कारणास्तव या नियुक्त्या रखडलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना दीर्घ प्रतिक्षा करावी लागत

► उर्वरित पान २ वर

## कपिलधारवाडीत जिल्हाधिकाऱ्यांची पाहणी, गावकऱ्यांना दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून झालेल्या सततच्या आणि अतिवृष्टीमुळे मौजे कपिलधारवाडी येथे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे . गावातील अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत , जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या भिंतींना व पाया भागाला भेगा पडल्या आहेत , तसेच कपिलधारवाडी ते मन्मथस्वामी मंदिर देवस्थानकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे . डोंगर परिसर सरकतोय का , कोसळतोय का , अशी भीती ग्रामस्थांमध्ये व्यक्त केली जात होती .



बीडचे जिल्हाधिकारी मा श्री विवेक जॉन्सन साहेब, यांच्या आदेशावरून व बीडचे तहसीलदार मा श्री चंद्रकांत शेळके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पाली विभागामध्ये अतिशय उत्कृष्टपणे आपले महसूल विभागाचे कर्तव्य बजावणाऱ्या अशा , पालीच्या पाली महसूल विभागामध्ये सर्वत्र परिचित असलेल्या व बीड जिल्ह्यामध्ये महसूल विभागाचे कर्तव्य काय असते हे आपल्या महसूल विभागाच्या कर्तव्यातून दाखवून देणाऱ्या अशा आदर्श लेडी सिंघम म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या मंडळ अधिकारी शीतल ताई चाटे , तलाठी अनिल गायकवाड यांनी कपिलधारवाडी येथे

► उर्वरित पान २ वर

## नंदकिशोर मुंदडा यांच्या आवाहनाला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### पुरग्रस्तांच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी जमला ३१लाख ८४हजार निधी




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोणीही हार, बुके, शाल आणू नयेत त्याऐवजी पुरग्रस्तांच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठीची मदत जमा करावी या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या चाहत्यांनी ३१ लक्ष ८४ हजार ८३० रुपयांचा निधी जमा केला.

संपुर्ण महाराष्ट्रात या वर्षी मोसमी पावसाने कहर केला. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांसह शेत जमिन ही वाहुन नेली. राज्यातील शेतकऱ्यांवर कोसळलेल्या या अस्मानी संकटाचा मुकाबला करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना मुख्यमंत्री पुरग्रस्त सहाय्यता निधीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. या अहवालाला प्रतिसाद देत नंदकिशोर मुंदडा यांनी केज विधानसभा मतदार संघातील नागरिकांना आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने कोणीही शाल, हार, बुके आणू नयेत, त्या ऐवजी मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी मदत आणून जमा करावी असे आवाहन केले होते. सदरील आवाहनाला प्रतिसाद देत नंदकिशोर मुंदडा यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या त्यांच्या हितचिंतकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी ठेवण्यात आलेल्या बॉक्स मध्ये भरभरून मदत केली. आज या रकमेची मोजदाद केली असता ३१ लाख ८४ हजार, ८३४ रुपयांचा भरघोस निधी जमा झाल्याचे

► उर्वरित पान २ वर

## सोन्याची चैन चोरी करणारा पोलिसांच्या ताब्यात

**१ लाख ५२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई**



**नेकनूर । प्रतिनिधी**

नेकनूर पोलीस ठाण्याच्या पथकाने चोरी प्रकरणातील आरोपीला ताब्यात घेत मोठी कामगिरी केली आहे. मांजरसुंबा येथे मागील महिन्यात मनोज जरांगे पाटील यांच्या सभेत दीपक जोगदंड यांची सोन्याची चैन चोरीला गेल्या प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अज्ञात चोरट्या विरोधात चोरट्या विरोधात गुन्हा क्रमांक २३०/२०२५, कलम ३०३(२) भा.दं.सं. अन्वये दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपासी चक्रे फिरवून गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेतला असता गुप्त मिळालेल्या माहितीच्या आधारे खात्री झाल्यानंतर कृष्णा वैजनाथ

► उर्वरित पान २ वर